# द टार्गेट या इंग्रजी पुस्तकाची मराठी आवृत्ती प्रकाशीत

**औरंगाबाद/ प्रतिनिधी**

अत्यंत कमी वयात केवळ आपल्या बौध्दिक कौशल्याने देश-विदेशात वैश्विक दर्जाची उत्कृष्ट मार्केटस निर्माण करुन भारताला जगाच्या नकाशावर मानाचे स्थान प्राप्त करुन देणारया नवउद्योजक जिग्रेश शाहांच्या विजयरथाला कुटील राजकीय कारस्थान व हीन दर्जाच्या षडयंत्राने कसे उध्वस्त करण्यात आले याची पुराव्यासहित तपशीलवार गाथाच वरिष्ट पत्रकार शांतनु गुहा रे यांनी आपल्या द टार्गेट या पुस्तकात मांडली.पेमेंट डिफॉल्ट घडवून जिग्रेश शाहांचे साम्राज्य उध्वस्त करणारया षडयंत्राचा गौप्यस्फोट करणारया द टार्गेट या इंग्रजी पूस्तकाची मराठी आवृत्ती आज येथे एका कार्यक्रैमात प्रकाशित करण्यात आली.